policyresearch.in
contact@policyresearch.in
+91 8007971692/ +91 9823431138
@policyresearch.in
@policy.research
@PRO_thinktank

Policy Research Organization
Reg.no: E- 8916/ Pune

दि. ३० जानेवारी २०२३

-प्रसिद्धीसाठी-

महाराष्ट्रातील २७ महानगरपालिकांचा ई-गव्हर्नन्स निर्देशांक **(City E-Governance Index)**

**URL: e-governance.info**

२०२५ पर्यंत भारतात ९० कोटीपेक्षा जास्त सक्रीय इंटरनेट वापरकर्ते असतील असा अंदाज आहे. त्याला प्रतिसाद म्हणून भारत सरकार आणि राज्य सरकार पातळीवरून महाराष्ट्र ई-गव्हर्नन्स धोरण (२०११), मोबाईल गव्हर्नन्स फ्रेमवर्क (२०१२),डिजिटल इंडिया मिशन (२०१५) अशा प्रकारचे प्रयत्न सुरु झाले. नागरिकांना सोप्या पद्धतीने सरकारी सेवा उपलब्ध व्हाव्यात, व्यवहारात पारदर्शकता असावी आणि आवश्यक माहिती सहजपणे उपलब्ध व्हावी हा ई-गव्हर्नन्सचा प्रमुख उद्देश आहे. आज महाराष्ट्रातली बहुसंख्य लोकसंख्या शहरी भागात राहते. या शहरांची ई-गव्हर्नन्सबाबतची सद्यस्थिती काय आहे याचा अभ्यास म्हणजे पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन (प्रो) ने बनवलेला हा शहर ई-गव्हर्नन्स निर्देशांक (City E-Governance Index). महाराष्ट्रातल्या २७ महानगरपालिका या निर्देशांकासाठी विचारात घेतलेल्या आहेत. १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत महापालिकांच्या अधिकृत वेबसाईट, मोबाईल अॅप्लिकेशन, सोशल मिडिया हँडल्स यांचा अभ्यास केला गेला.

हा अहवाल **e-governance.info** या वेबसाईटवर बघण्यासाठी उपलब्ध आहे.

निर्देशांकाचे निकष:

सेवा **(Services):** शहरातील नागरिकांना आणि व्यावसायिकांना मिळणाऱ्या महापालिकेच्या किती सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत?

पारदर्शकता **(Transparency):** महापालिकेच्या कारभारातली पारदर्शकता आहे का? आपण होऊन महापालिकेने माहिती ऑनलाईन प्रसिद्ध केली आहे का?

उपलब्धता **(Accessibility):** महापालिकेची वेबसाईट, मोबाईल अॅप्लिकेशन वापरायला किती सुलभ आणि सोपे आहे?

हे तीन मुख्य निकष सर्व महापालिकांच्या

- अधिकृत वेबसाईट
- मोबाईल **app**
- सोशल मिडिया हँडल्स

या माध्यमांवर तपासले. हे तीन मुख्य निकष, तीन माध्यमे आणि यामध्ये प्रत्येकात काही उपनिकष असा मिळून एकूण आकडा ११४ आहे. ही तपासणी Binary पद्धतीने केली आहे. उदाहरणार्थ एखादी सेवा उपलब्ध असेल तर एक

 Registered address: A16 Venkatesh Complex, Panand Road, Karvenagar, Pune 411052

गुण आणि नसेल तर शून्य.  ११४ पैकी गुण दिले आहे. समजायला सोपे जावे म्हणून सर्व गुणांचे रुपांतर करून १० पैकी रेटिंग दिले आहे.

यंदाच्या वर्षी हा निर्देशांक तयार करण्याच्या सर्व टप्प्यांवर महानगरपालिकांना बरोबर घेऊन काम करण्यावर भर देण्यात आला आहे. निर्देशांकाचे काम सुरु करण्याआधी सर्व महानगरपालिकांना लेखी पत्र पाठवण्यात आले होते. तसेच अहवाल प्रसिद्ध करण्यापूर्वी त्यांना त्यांच्या महानगरपालिकेची कामगिरी देखील पाठवण्यात आली होती. यावेळी या अहवालाला मुंबई, कोल्हापूर, अकोला, पिंपरी चिंचवड, उल्हासनगर या महानगरपालिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. या निर्देशांकाच्या निमित्ताने पालिका अधिकारी आणि पालिका प्रशासन यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

<u>उल्लेखनीय</u>

· एकुणात प्रथम तीन शहरे

१. पिंपरी चिंचवड (६.२३ /१०)

२. मीरा भाईंदर (५.७९ /१०)

३. नाशिक ( ४.७४ / १० )

· ‘उपलब्धता’ **(Accessibility)** निकषावर सर्वोत्तम तीन

१. पिंपरी चिंचवड ( ८.५७ / १०)

२. मुंबई (५.७१ / १० )

३. कल्याण डोंबिवली, मीरा भाईंदर, नाशिक, पुणे  ( ५.24 / १० )

· ‘पारदर्शकता’ **(Transparency)** निकषावर सर्वोत्तम तीन

१. पिंपरी चिंचवड , मीरा भाईंदर (६.३६ /१०)

२. ठाणे ( ५.० / १० )

३. वसई विरार ( ४.७७ / १० )

· सेवा’ **(Services)** निकषावर सर्वोत्तम तीन

१. नाशिक (५.९२ /१०)

२. पुणे (५.७१ /१०)

३. मीरा भाईंदर ( ५.५१ / १० )

 Registered address: A16 Venkatesh Complex, Panand Road, Karvenagar, Pune 411052

policyresearch.in
contact@policyresearch.in
+91 8007971692/ +91 9823431138
@policyresearch.in
@policy.research
@PRO_thinktank



- ‘वेबसाईट’ या माध्यमाबाबत सर्वोत्तम तीन

१. मीरा भाईंदर ( ८.०३ / १० )

२. नवी मुंबई , पिंपरी चिंचवड ( ७.०५/१० )

३. ठाणे ( ६.७२ / १० )

- ‘मोबाईल अॅप्लिकेशन’ या माध्यमाबाबत सर्वोत्तम तीन

१. पिंपरी चिंचवड (५.० /१०)

२. नाशिक ( ४.४ / १० )

३. पुणे ( ३.४ / १० )

- ‘सोशल मिडिया’ बाबत सर्वोत्तम तीन

१. पिंपरी चिंचवड (१० /१०)

२. अमरावती , औरंगाबाद, कल्याण-डोंबिवली, मुंबई , नागपूर , पुणे , ठाणे ( ६.६७ / १० )

३. अकोला ( ३.३३ / १० )

<u>लक्षवेधी</u>

- पारदर्शकता (Transparency) या निकषासाठी मालेगावला शून्य गुण आहेत.
- सेवा ( Services) या निकषासाठी अहमदनगरला शून्य गुण आहेत.
- मोबाईल appया निकषावर तब्बल ८ शहरांना शून्य गुण आहेत.
- सोशल मिडियाच्या निकषावरही ८ शहरांना शून्य गुण आहेत.
- सर्वच्या सर्व शहरांमध्ये सामायिक (comm on) असणारी एकमेव गोष्ट म्हणजे मालमत्ता कर वेबसाईटवर भरण्याची सुविधा.

शहरांची एकूण गुणांप्रमाणे विभागणी :

| **गुण (१० पैकी)** | शहरे |
|---|---|
| १-२ | मालेगाव (१.०५), धुळे ( १.२३ ), अहमदनगर ( १.५८ ), परभणी ( १.६७ ), चंद्रपूर (१.६७ ), अकोला ( १.७५), भिवंडी- निझामपूर ( १.९३) |

| | |
|---|---|
| २-३ | कोल्हापूर (२.११ ), लातूर ( २.१९) , उल्हासनगर (२.२८), सोलापूर (२.४६ ), जळगाव (२.४६), नांदेड वाघळा ( २.८१), सांगली मिरज कुपवड (२.८९), पनवेल व नागपुर ( २.९८ ), |
| ३-४ | कल्याण-डोंबिवली (3.33), औरंगाबाद (३.५१), अमरावती (३.६८), वसई विरार व ठाणे (३.७७) |
| ४-५ | मुंबई (४.०४ ), पुणे ( ४.४७ ), नवी मुंबई ( ४.५६), नाशिक ( ४.७४) |
| ५+ | मीरा भाईंदर (५.७९ ) , पिंपरी-चिंचवड (६.२३ ) |

पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशनची निरीक्षणे

- सर्वच महानगरपालिकांना सुधारणेला भरपूर वाव आहे. अगदी पहिल्या आलेल्या पिंपरी चिंचवडचेही गुण जर बघितले तर ते १० पैकी केवळ ६.२३ एवढेच आहेत. १६ महापालिकांचे गुण ३ पेक्षाही कमी आहेत.

- अभ्यासादरम्यान असे अनेकदा घडले की काही महापालिकांच्या वेबसाईट अचानक बंद दिसत होत्या. याचे कोणतेही स्पष्टीकरण कुठेच आढळले नाही.

- अनेक वेबसाईटवर असणाऱ्या स्पेलिंगच्या चुका, माहिती सापडेल अशी नीट ठेवलेली नसणे, माहिती अद्ययावत नसणे, वेबसाइटवर संपर्कासाठी उपलब्ध असलेले मोबाइल नंबर आणि ई मेल चुकीचे आढळले. यामुळे अधिकृत माहिती शोधताना अडचणी आल्या.

- अनेक महापालिकांनी ***.gov.in*** किंवा ***.nic.in*** असे अधिकृत सरकारी डोमेन नेम वापरलेले नाही. कोणते मोबाईल app अधिकृतरीत्या महापालिकेचे आहे हेही काही वेळा पटकन समजत नाही.

- हा अहवाल मुख्यतः संख्यात्मक (Quantitative) आहे, गुणात्मक (Qualitative) नाही. उदाहरणार्थ, एखादी सोय उपलब्ध आहे किंवा नाही एवढेच बघितले आहे. मात्र प्रत्यक्षात ऑनलाईन अर्ज केल्यावर त्याचे पुढे काय घडते हे तपासलेले नाही. गुणात्मक विश्लेषण केल्यास काही शहरांचे गुण अजूनच कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

- अधिकृत सोशल मिडिया हँडल्स महापालिकेच्या वेबसाईटवर अद्ययावत नसणे, एकाच महापालिकेची एकापेक्षा जास्त सोशल मिडिया हँडल्स असणे, काही महापालिकांच्या बाबतीत अधिकृत वेबसाईटचाही पत्ता वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळा असणे अशा गोष्टी आढळून आल्या.

<u>अभ्यासगट</u>

जवळपास तीन महिन्यांच्या कालावधीत 6 जणांच्या गटाने या प्रकल्पावर काम केले. नेहा महाजन **(Director, PRO)** यांनी प्रकल्पाचे नेतृत्व केले तर मनोज जोशी (Chief Data Analyst, PRO) आणि तन्मय कानिटकर (President, PRO) यांनी प्रकल्पाच्या अभ्यासात आणि नियोजनात योगदान दिले. लोकांना सुटसुटीतपणे हा अहवाल बघता यावा म्हणून वेबपेज बनवण्याचे काम गौरव देशपांडे याने समर्थपणे पार पाडले. शरयू जोरकर आणि प्रणव जाधव यांनी माहिती संकलन, तपासणीमध्ये आणि अहवाल लिखाणामध्ये महत्वाचे योगदान दिले.

दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या या अहवालांतून शहरांच्या ई-गव्हर्नन्स मध्ये कशी आणि किती प्रगती वा अधोगती झाली आहे याची माहिती नागरिकांना मिळत राहील. मागच्यावर्षीच्या तुलनेत यंदा जळगाव, पनवेल आणि औरंगाबाद ची कामगिरी लक्षणीयरीत्या सुधारलेली दिसून आली. तर धुळे, मालेगाव, अहमदनगर यांची कामगिरी गेल्यावर्षीच्या तुलनेत खालावलेली दिसून आली.

कोल्हापूर, पिंपरी चिंचवड, मुंबई, उल्हासनगर, अकोला या महानगरपालिकांनी हा निर्देशांक तयार होताना आपल्या महानगरपालिकेची कामगिरी योग्यरित्या तपासली जाईल, त्याचे योग्य मूल्यांकन केले जाईल याची काळजी घेतली. आमच्या फोन call पासून ईमेल ला सकारात्मक प्रतिसाद दिला. आमच्यासाठी हि आमचा उत्साह वाढवणारी गोष्ट ठरली.

आमचा हा निर्देशांक आमच्या वेबसाईटवर बघता येईलच, सोबतच मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषेतला संपूर्ण तपशीलवार अहवाल डाउनलोड करता येईल.

**e-governance.info** ही लिंक जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवावी ही नम्र विनंती.

| नेहा महाजन | तन्मय कानिटकर |
|---|---|
| 8007971692 | 9823431138 |